ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-I June 2012

# पर्यटनातून इतिहासाचे अध्ययन स्त्रोत

प्रा. वाघेरे परशराम भगिरथ
मराठा विद्या प्रसारक समाजाचे
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक

**पर्यटनातून इतिहासाची संकल्पना**

- मानवाची उत्पत्ती ते पर्यटन
- भटकंतीतून पर्यटन
- पर्यटनाकडून इतिहास अध्ययन स्त्रोताकडे
- व्याख्या

**उद्दिष्टये**

१. पर्यटनातून इतिहास अध्ययन स्त्रोतांची माहिती घेणे.
२. पर्यटनातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधणे.
३. पर्यटनातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे.

**पर्यटनातून इतिहास अध्ययनाचे स्त्रोत**

अध्ययनाचे स्त्रोत

- → विविध प्रार्थना स्थळे
- → ताम्रपट
- → शिलालेख
- → किल्ले
- → लेणी
- → ऐतिहासिक वास्तु
- → वस्तुसंग्रहालय
- → अभयारण्ये
- → गिर्यारोहण

**पर्यटनातून शैक्षणिक उपयुक्तता**

१) पर्यटनातून इतिहासातील शिलालेख ताम्रपट लेण्या, गुहा मंदिरे, वास्तु, किल्ले यांची माहिती मिळवून प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळते.

२) पर्यटनातून संताची कर्मभूमी, जन्मभूमींची खातरजमा करतो.

३) पर्यटनातून निरीक्षणाची व धाडसी वृत्ती निर्माण होते.

४) पर्यटनातून इतिहास कालीन घडलेल्या घटनांची माहिती मिळते.

**पर्यटनातून इतिहासाची संकल्पना :**

मानवाची उत्पत्ती झाल्यापासून मानवाचे अध्ययन सुरू होते. त्याची या पृथ्वीवर भटकंती सुरू झाली. म्हणजेच त्याचे अध्ययन सुरू झाले. मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर निसर्गाशी समरस होऊन निसर्गात असणाऱ्या वास्तूचा शोध घेऊ लागला जणू काही तो पर्यटन करून आपल्या सोबत मुलांना घेऊन परिसरात असणाऱ्या वास्तु, शिलालेख, ताम्रपट, लेण्या, राजे रजवाडे तसेच संतांची, वीरांची जन्मस्थळे, समाधी स्थळे, पूर्वी राजांनी आपल्या आवडत्या पत्नीसाठी किंवा त्यांची हौस पुरविण्यासाठी बांधलेली वास्तु याचे आज पर्यटन करीत असताना माहितीचे स्त्रोत निर्माण होतात. टकंती मधूनच पर्यटनाचा उदय झाला. माणूस जस जसा शिक्षण घेत गेला. दळणवळणाची साधने निर्माण झाली. तसे त्याचे स्थलांतर सुरू झाले.

पूर्वीच्या काळी राजे रजवाडे यांच्या लढाया सुरू झाल्या. त्यावेळी त्यांच्याकडे घोडदळ, पायदळ अशी यंत्रणा होती. राजांनी आपल्या आठवणी रहाव्या म्हणून मंदिरे, शिलालेख, ताम्रपट, लेण्या, समाधी स्थळे इत्यादी स्थळे आज पर्यटनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे इतिहासाचे अध्ययन स्त्रोत बनले आहे. स्थळ आणि काळ हे इतिहासाचे दोन डोळे आहेत. विदयार्थ्यांना चार भिंतीच्या आत शिक्षण दिले म्हणजे संपूर्ण शिक्षण मिळाले असा आपला समज आहे. शाळे व्यतिरिक्त विद्यार्थी हा समाज, परिसर तसेच पर्यटन, क्षेत्रभेट या माध्यमातून ज्ञान मिळवित असतो. पर्यटन आणि इतिहास ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हे जाणून घेण्यासाठी आधुनिक काळात शिक्षणाला खूप महत्त्व येणार आणि शिक्षणामुळे जनसामान्याची उन्नती होणार अशी दृष्टी शिक्षण विचारवंतांना होती. म्हणून गत काळात काय घडले हे जाणून घेण्याची माणसाला नेहमीच उत्सुकता वाटत आली आहे. ही उत्सुकता पर्यटनातून इतिहासामुळे पूर्ण होते.

पर्यटनातून इतिहासाचे अध्ययन होते. प्रत्यक्ष घडलेल्या घटना, कालानुक्रम, वास्तु व विचार स्त्रोतांचा अभ्यास होय. वर्गात विद्यार्थ्याना एखाद्या स्थळाची, किल्ल्याची माहिती दिली तर ती स्मरणात राहिलीच याची शाश्वती नाही. अशा वेळी पालकांच्या पर्यटनातून विद्यार्थ्यांना मिळालेली माहिती कायम स्वरूपी स्मरणात राहिल. एखाद्या स्थळाविषयी, संग्रहालयाविषयी, अभयारण्याविषयी अथवा ऐतिहासिक वास्तुविषयी अर्धवट राहिलेली संकल्पना ही पर्यटनातून पूर्ण होऊ शकते.

इतिहास हा एक शास्त्र आहे. हा विचार २० व्या शतकाच्या प्रारंभापासून सुरू झाला. इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठातील प्राध्यापक ब्युरी यांनी History is science no more no less या शब्दात इतिहास एक शास्त्र आहे. असे प्रथम ठामपणे प्रतिपादन केले त्यांच्या एकाच शब्दाने इतिहास संशोधनाची भाषा बदलली. इतिहासाचे शास्त्र म्हणून अध्ययन, संशोधनाची आणि लेखनाची पद्धत अस्तित्वात आली. तंत्रज्ञान आणि संज्ञापन क्षेत्रात झपाट्याने विकास होत आहे. त्यामुळे पर्यटनाला अधिक महत्त्व प्राप्त होत आहे. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाने मुंबई, पुणे, कोल्हापूर, रत्नागिरी—गणपतीपुळे येथे पर्यटकांसाठी अतिथी गृह, हॉटेल्स राहण्याची सोय निर्माण केली आहे.

**व्याख्या —**

**पर्यटन :**

व्यक्तिला आपल्या टकंतीद्वारे किल्ले, वास्तू, मंदिरे, संग्रहालय व अभयारण्य इत्यादी स्थळांना भेटी देण्याचा उपक्रम होय.

**इतिहास :**

व्यक्ति, समाज, स्थल आणि काल या अनुबंध चतुष्ट्यतील मानवाची सर्वांगिण कहाणी म्हणजे इतिहास होय. — डॉ. राजा दीक्षित

इतिहास म्हणजे केवळ राजकीय घटनांचा अभ्यास नसून मानवी जीवनाच्या सर्व पैलूंचा अभ्यास होय.

**उद्दिष्ट्ये —**

१) पर्यटनातून इतिहास अध्ययन स्त्रोतांची माहिती घेणे.

२) पर्यटनातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधणे.

३) पर्यटनातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-I June 2012


**पर्यटनातून इतिहास अध्ययनाचे स्त्रोत —**

पर्यटनातून इतिहास अध्ययनाचे स्त्रोत कसे निर्माण झाले. निसर्गाकडे आपण डोळे उघडे करून बघितले तर इतिहास अध्ययनाचे स्त्रोत म्हणजे शिलालेख, ताम्रपट, लेण्या, राजवाडे, किल्ले, संतांची, वीरांची जन्मस्थळे, समाधी ही आपणास पर्यटनातून पहावयास मिळतात. ते खालीलप्रमाणे —

**पर्यटनातून अध्ययन स्त्रोत**

| प्रार्थनास्थळे | लेणी | किल्ले | ऐतिहासिक वास्तु | वस्तुसंग्रहालय | अभयारण्य |
|---|---|---|---|---|---|
| मंदिरे<br>मशिद<br>गुरूद्वार<br>चर्च | वेरूळ<br>अजिंठा<br>घारापुरे<br>पांडव | शिवनेरी<br>सिंहगड<br>रायगड<br>विजयदुर्ग<br>असे एकूण १८७ | स्तूप<br>ताजमहाल | पर्वती टेकडी | गौताला<br>चांदोली<br>नवेगाव<br>ताडोबा |

वरीलप्रमाणे पर्यटनातून इतिहास अध्ययनाचे स्त्रोत निर्माण झालेले आहेत.




**पर्यटनातून शैक्षणिक उपयुक्तता**

१. पर्यटनातून इतिहासकालीन घडलेल्या घटनांची माहिती मिळते.
२. पर्यटनातून किल्यांची माहिती मिळवून पाहण्याची संधी मिळते.
३. पर्यटनातून वर्गात घेतलेले इतिहासाचे अनुभवांची उजळणी होते.
४. पर्यटनातून तिचा बौध्दित, भावनिक, सामाजिक कौशल्यांचा विकास होतो.

५. पर्यटन करून आल्यावर वर्गात अध्ययन करतांना एखादया बघितलेल्या वास्तुचे, किल्ल्यांचे हुबेहुब चित्रण डोळयासमोर आणतो.
६. महाराष्ट्रातील संताची, वीरांची जन्मभूमी,कर्मभूमीची पर्यटनातून खातरजमा करतो.
७. पर्यटनातून विविध ठिकाणचा प्रदेश व भौगोलिक परिस्थिती समजावून घेतात.
८. पर्यटनातून विना आनंद मिळवून मानसिक शक्तीचा विकास होतो.
९. इतिहासात झालेल्या लढाया या प्रत्यक्ष त्या लढाईची जागा पाहण्याची संधी मिळते.
१०. पर्यटनातून वि. ना. गनिमी काव्याची माहिती मिळते.
११. पर्यटनातून भूकालीन घडलेल्या घटनांचा आढावा घेता येतो.
१२. पर्यटनातून विद्यार्थ्यांचा ज्ञानात भर पडते.
१३. पर्यटनातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो.
१४. पर्यटनातून निरीक्षण कौशल्याचा विकास होतो.
१५. पर्यटनातून धाडसी वृत्ती निर्माण होते.
१६. पर्यटनातून भौगोलिक परिस्थितीशी समायोजन साधतो.

**सारांश —**

पर्यटनातून इतिहासाचे अध्ययन होत असतांना विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होतो. पर्यटनातून इतिहासातील घटना, शिलालेख, ताम्रपट, लेण्या, गुहा, किल्ले, मंदिरे, ऐतिहासिक वास्तु याव्दारे प्रत्यक्ष माहिती मिळवून पर्यटनाचा आनंद मिळतो. पालकांच्या पर्यटनातून विद्यार्थ्यांचा मानसिक विकासही होतो. विद्यार्थ्यांना वर्गात दिले जाणारे ज्ञान व अनुभव याची उजळणी करण्याचे साधन म्हणजे पर्यटन होय. पर्यटनातून विद्यार्थ्यांचा शारिरीक, बौध्दिक, भावनिक, सामाजिक विकास घडून येतो. महाराष्ट्रातील मंदिरे, वास्तु, वस्तुसंग्रहालये ही इतिहासाची आठवण करून देणा—या स्मृती आहेत. पर्यटनातून विद्यार्थ्याच्या कलागुण संगित चित्रकला यातून कलाक्षेत्राची आवड निर्माण होते. पालकांनी मिळेल त्या वेळेत पर्यटन आवश्य करून विद्यार्थ्यांच्या उपजत शक्तींना संधी उपलब्ध करून दयावी ही अपेक्षा !

**संदर्भ —**

गुणाजी मिलींद (२००६) भटकंती, राजहंस प्रकाशन, पुणे.
गो. नी. दांडेकर (२००१) महाराष्ट्र दर्शन मृण्मयी प्रकाशन, पुणे.
दत्तक गावांचा इतिहास (२००८) खंड— १ व २ पुणे विद्यापीठ मुद्राणालय, पुणे.